प्रेसनोट दिनांक १५/०६/२०२४

**सराईत गुन्हेगाराकडून, घरफोडीचे ०५ आणि मोटार सायकल चोरीचे ०२ असे ०७ गुन्हे उघडकीस शहर गुन्हे शाखेची कामगिरी.**

---

दिनांक १०/०६/२०२४ रोजी, सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे तपास पथकातील पोह/१३२६ महेश शिंदे यांना माहीती मिळाली की, एक इसम चोरीचे सोन्याचे, चांदीचे दागीने विक्री करण्यासाठी मोहोळ वरून पुणे-सोलापूर हायवे मार्गे, जुना पुना नाका येथून सोलापूर शहरात येणार आहे. त्याप्रमाणे सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे तपास पथकानी बातमीचे ठिकाणी तात्काळ जाऊन, सापळा लावुन, सदर ठिकाणी घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार नामे- शंकर ऊर्फ हाडया ऊर्फ रवी मधूकर पवार, वय-२२ वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. भंडारपायथा, येलवाडी, जुन्या टोलनाक्या जवळ, देहुगांव, पुणे सध्या - ढोक बाभुळगांव ता.मोहोळ, जि.सोलापूर यांस ताब्यात घेतले. त्यावेळी, नमूद आरोपीकडे **एम आय डी सी पोलीस स्टेशन गु.र.नं.२६६/२०२४** प्रमाणे दाखल गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्या-चांदीचे दागीने, तसेच **वळसंग पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण गु.र.नं.२५२/२०२४ भादवि ३७९** अन्वये दाखल गुन्हयात चोरीस गेलेली मोटार सायकल मिळुन आली. त्यामुळे, सदरची मोटार सायकल व दागिने जप्त करणेत आले आहे.

त्यानंतर, आरोपी नामे- शंकर ऊर्फ हाडया ऊर्फ रवी मधूकर पवार यास, सपोनि/संजय क्षिरसागर यांनी, एम.आय.डी.सी. पोलीस ठाणेकडील वरील नमूद गुन्ह्यात अटक केली. त्यानंतर, नमूद आरोपीकडे, पोलीस कोठडी दरम्यान कौशल्यपुर्वक तपास करून, त्याचेकडुन खालील नमूद गुन्हयातील **एकुण ५०.५९० ग्रॅम सोन्याचे दागीने १,४२,०००/-रू किंमतीचे, २६३.५०० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागीने २५,२५०/-रू किंमतीचे, ०२ मोटार सायकल ५५,०००/-रू किंमतीचे, रोख रक्कम १६,५००/-रू.** आणि आरोपी हा, घरफोडी करण्यासाठी वापरत असलेली कटावणी १००/-रू असा, **एकुण २,३८,८५०/-रू किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करून ०७ गुन्हे उघडकीस आणले आहेत.** नमूद आरोपीकडुन उघडकीस आलेले गुन्हे खालील प्रमाणे :-

| अ.क्र | पोलीस स्टेशन | गु.र.नं./ कलम | आरोपीचे नाव |
|---|---|---|---|
| १. | एम आय डी सी | २६६/२०२४ भादवि-४५४, ४५७, ३८० | ०१) शंकर ऊर्फ हाडया ऊर्फ रवी मधूकर पवार |
| २. | एम आय डी सी | २८५/२०२४ भादवी- ४५४, ४५७, ३८० | ०१) शंकर ऊर्फ हाडया ऊर्फ रवी मधूकर पवार |
| ३. | फौजदार चावडी | ३६८/२०२४ भादवि- ४५७, ३८० | ०१) शंकर ऊर्फ हाडया ऊर्फ रवी मधूकर पवार |
| ४. | फौजदार चावडी | १९/२०२४ भादवी ४५४, ४५७, ३८० | ०१) शंकर ऊर्फ हाडया ऊर्फ रवी मधूकर पवार |
| ५. | सदर बझार | ३३९/२०२४ भादवि ४५४, ३८० | ०१) शंकर ऊर्फ हाडया ऊर्फ रवी मधूकर पवार |
| ६. | वळसंग, सोलापूर ग्रामीण | २५२/२०२४ भादवि ३७९ | ०१) शंकर ऊर्फ हाडया ऊर्फ रवी मधूकर पवार<br>०२) बंडु मधुकर पवार (पाहिजे आरोपी) |
| ७. | अक्कलकोट उत्तर, सोलापूर ग्रामीण | २४३/२०२४ भादवि ३७९ (मुद्देमाल मोहळ पो.स्टे.जमा आहे.) | ०१) शंकर ऊर्फ हाडया ऊर्फ रवी मधूकर पवार<br>०२) बंडु मधुकर पवार (पाहिजे आरोपी) |

अशा प्रकारे, शहर गुन्हे शाखेकडील, सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे तपास पथकाने उत्कुष्ट कामगीरी करून, घरफोडीचे ०५ गुन्हे आणि मोटार सायकल चोरीचे ०२ असे एकुण ०७ गुन्हे उघडकीस आणून, **एकुण २,३८,८५०/-रू** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. **नमूद आरोपी हा, घरफोडी चोरी मधील इतर १४ गुन्ह्यामध्ये पाहीजे आरोपी आहे.**

सदरची कामगिरी मा. श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा), श्रीमती प्रांजली सोनवणे सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली, स.पो.नि./संजय क्षिरसागर, पोलीस अंमलदार- महेश शिंदे, अनिल जाधव, कुमार शेळके, यांनी केली आहे. सदर गुन्हयाचे तपासामध्ये, निलोफर तांबोळी, बापु साठे, सुभाष मुंडे, सिध्दाराम देशमुख, चालक सतिश काटे व बाळु काळे यांनी मदत केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**यांचे करीता.**